पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
प्रशासन विभाग

# जाहिरात क्र.१०६३/२०२१ चे अनुषंगाने निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवरील गट "ब" ते "ड" मधील पदे फक्त ६ महिने कालावधीकरीता दरमहा एकत्रित मानधनावर भरण्याकरीता जाहिरात क्र.१०६३/२०२१ दि.०२/०९/२०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत आले होते. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे त्यांना (शैक्षणिक पात्रता व अनुभव) गुण दिले होते व गुण दिल्यानंतर एकत्रित पदनिहाय गुणांची यादी महापालिकेच्या संकेत स्थळावर दि.०२/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करून उमेदवारांच्या हरकती व सुचना मागविल्या होत्या. त्यानुसार प्राप्त हरकती व सुचनांची तपासणी केल्यानंतर वैध हरकती मान्य केलेल्या आहेत व अवैध हरकतींचा विचार करणेत आलेला नाही.

वैध हरकतींचा विचार केल्यानंतर महापालिकेने दिलेल्या जाहिराती मधील प्रत्येक पदाकरीता गुणानुक्रमे एका पदाकरिता ३ उमेदवार (१:३) या प्रमाणात तसेच ज्या ठिकाणी उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले आहेत, त्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभवाची मूळ कागदपत्रे तपासणीसाठी दिनांक १४/१०/२०२१ व १६/१०/२०२१ रोजी बोलाविण्यात आले होते. सदर दिवशी उपस्थित उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अनुषंगिक मूळ कागदपत्रांची तपासणी करून उमेदवारांना किमान अर्हतेमध्ये प्राप्त केलेले प्रत्यक्षातील गुणांची टक्केवारी तसेच उच्च शैक्षणिक पात्रता व अनुभव (जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे) या तिन्हीचे एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणानुक्रमे प्रवर्ग निहाय निवड यादी या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर निवड यादी मध्ये निवड झालेल्या उमेदवारांनी दि.०८/११/२०२१ ते दि. १२/११/२०२१ या कालावधी मध्ये कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ९.४५ ते सांयकाळी ६.१५ या वेळेत रूजू होण्यासाठी मुळ कागदपत्रे व अलीकडील काढलेल्या फोटोच्या २ फोटोसह पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, मुंबई पुणे हाईवे लगत, प्रशासन विभाग, ४था मजला या ठिकाणी उपस्थित रहावे व रूजू होण्यासाठी येताना सोबत सादर केलेल्या विहित नमुन्यात र.रू.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहिल. निवड झालेल्या उमेदवारांनी विहित दिनांकास उपस्थित न राहिल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. रूजू होणेसाठी आलेनंतर निवड झालेल्या उमेदवारांना महानगरपालिकेचे मानधनावरील नियुक्तीचे आदेश समक्ष देण्यात येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. प्रसिध्द केलेल्या निवड यादीतील उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांनी उपस्थित राहू नये.

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/२४/कावि/९४१ /२०२१
दिनांक - २३/१०/२०२१

(र.रु.५00/- चे स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड)

# <u>हमीपत्र</u>

मी,श्री/श्रीमती-----------------------------------------------------------------------,वय----------वर्ष,
राहणार---------------------------------------------------------------------------------------------------------,
हमीपत्र लिहुन देतो/देते की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवरील मानधनावरील पदे भरणेसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरात क्र.१०६३/२०२१ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार माझी -----------
----------------या पदासाठी सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर निवड झालेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत रुजू होणेपुर्वी मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की,

१. जाहिरातीध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे मी पालन करील व त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये विनियमीत होते. या ॲक्टमधील कलम ५१, ५३ व ५४ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवर नियमित नेमणूक मिळण्यासाठी शासन मान्य पदांची उपलब्धता विहित पध्दतीची निवड प्रक्रिया अनिवार्य आहे. महानगरपालिकेस तातडीची आवश्यकता असल्याने या बाबींचे अनुपालन न करता तात्पुरती व्यवस्था म्हणून मला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये दरमहा एकत्रित मानधनावर करारपध्दतीने केवळ हंगामी स्वरुपावर ६ महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक मिळालेली आहे याची मला समज आहे.

३. माझी एकत्रित मानधनावर करारपध्दतीने केवळ हंगामी स्वरुपावर करणेत आलेली नेमणूक नियमित होणार नाही, याची मला पुर्ण व स्पष्ट समज मिळालेली असून हे मला मान्य आहे.

४. माझी एकत्रित मानधनावर करारपध्दतीने, हंगामी स्वरुपाची करणेत आलेली नेमणूक महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-यांकडून नेमणूक कालावधीनंतर अथवा तत्पुर्वी कधीही संपुष्टात आणण्यात येईल याची मला समज देण्यात आली असून ते मला मान्य आहे.

५. माझी सदरची एकत्रित मानधनावर करारपध्दतीने , केवळ हंगामी स्वरुपाची नेमणूक असून ह्या कालावधीत महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत लागू असलेले तसेच भविष्यात वेळोवेळी लागू होणारे सर्व कायदे, नियमांचे पालन करणे माझ्यावर बंधनकारक आहे.

६. प्रस्तूतचा माझा मानधनावरील नेमणूकीचा कालावधी संपलेनंतर अथवा तत्पुर्वी माझी नेमणूक कोणत्याही कारणास्तव संपुष्टात आणल्यास मी सदरची मानधनावरील नेमणूक महानगरपालिकेच्या स्थायी सेवेत कायम करणे करिता मी महानगरपालिकेस, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिका-यास अथवा प्राधिका-यास जबाबदार धरणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही न्यायालयीन कार्यवाही, प्रशासकीय, राजकीय, संघटनात्मक अथवा अन्य मार्गांचा अवलंब करणार नाही, तसेच महानगरपालिकेकडून कोणताही खर्च मागणार नाही.

७. सदरचे हमीपत्र मी माझे स्वखुशीने, कोणत्याही दबावाखाली न राहता लिहून देत असून ते माझ्यावर बंधनकारक राहील.

ठिकाण:-

दिनांक:- (हमीपत्र लिहून देणारे यांचे नाव व स्वाक्षरी)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018

एकत्रीत मानधनावरील भरती - निवड यादी

पदनाम - परवाना निरीक्षक

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | उमेदवाराचे नाव | एकूण गुण | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| | | **खुला** | | |
| 1 | 3400 | Tingre Mahesh Balasaheb | 100 | खुला |
| 2 | 7087 | GUNDVAN YASHWANTAPPA KALLAPPA | 100 | खुला |
| | | **अनुसूचित जाती** | | |
| 1 | 999 | PATHADE GORAKSH SURENDRA | 90 | अनुसूचित जाती |
| | | **इतर मागास प्रवर्ग** | | |
| 1 | 9375 | MAYEKAR AMISHA SANDIP | 90 | इतर मागास प्रवर्ग |

टिप : ज्या ठिकाणी उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले आहेत आशा वेळेस उमेदवारांचे किमान अर्हतेमधील पदवी परीक्षेतील प्रत्यक्षातील गुणांची टक्केवारी, पदव्युत्तर पदवीचे गुण व शासकीय / निमशासकीय अनुभव यानुसार गुणांची एकत्रीत बेरीज करुन निवड करण्यात आली आहे.

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411018